ePaper

**'शक्ती'वरून कलगीतुरा, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या टीकेवर राहुल गांधींचं चोख प्रत्युत्तर!**




| वर्ष - 7 । अंक - 300 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- रोहितचा वारसा मी पुढे नेणार
- कतरिनाची ही सवय
- सत्य बोललो की, अर्थ बदलतात
- केवळ निरोप आला होता : राज ठाकरे


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 19 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महापालिका प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

# पाणी काटकसर करा; गैरवापर टाळा!

### » मिळकतधारकांना इशारा : पाणी दुरूपयोग केल्यास नळजोड तोडणार!

। पिंपरी।महाईन्यूज

**उन्हाळा सुरु झालेला आहे. येणारा पावसाळा जून मध्ये सुरु होईल यांची शाश्वती नाही. पावसाळा हा विलंबाने सुरु झाल्यास पाण्याची टंचाई शहरात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पाणी आतापासून सर्व नागरिकांनी काटकसरीने व जपून वापरणे अत्यावश्यक आहे. यासाठी पिण्याच्या पाण्याचा गैरवापर टाळणे आवश्यक आहे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.**






यासाठी सर्व नागरिकांनी पिण्याचे पाणी हे घरगुती वापरासाठी योग्यरित्या व काटकसरीने वापरावे. पाणी हे शिळे होत नसल्याने शिल्लक असलेले पाणी फेकून देऊ नये. त्या पाण्याचा पुर्नवापर करावा तसेच, पिण्याचे पाणी हे वाहने स्वच्छ करणे, बागकाम व कुंड्यासाठी, घर किंवा इमारत व परिसर स्वच्छ करणेसाठी, धुण्यासाठी वापरू नये. तसेच, सर्व सोसायटी धारकांनी एस.टी.पी. आणि बोअरवेल सुस्थितीत ठेवून त्याचे पाणी सदनिकांनामध्ये स्वच्छतागृह, सोसायटी अंतर्गत उद्यान परिसराची स्वच्छता इत्यादींसाठी वापरावे, जेणेकरुन पिण्याच्या पाण्याची बचत होईल. पिण्याच्या पाण्याचा गैरवापर गाड्या धुणे, रस्ते धुणे, घर, सोसायटी परिसर धुणे यासाठी करत असल्याचे निदर्शनास आलेस सदर ग्राहकांना गैरवापर होत असल्याबाबत प्रथमतः नोटीस बजाविण्यात येईल. तदनंतरही पुन्हा दुसऱ्यांदा असा पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करताना कोणीही आढळल्यास कोणतीही सबब, ऐकूण घेतली जाणार नाही व तात्काळ नळजोड तोडण्यात येईल. तरी सर्व पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, पाणी हे जीवन आहे. पाण्याचा वापर काटकसरीने करावा. ते जपून वापरावे म्हणजे पाण्याची बचत होईल व यामुळे यावर्षी येणाऱ्या पावसाळ्यापर्यंत म्हणजे माहे- जुन व जुलै पर्यंत पाणी सर्वांना पुरेसे उपलब्ध होऊ शकेल आणि पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही व यंदाचा उन्हाळा सर्वांना सुसह्य जाईल.

### पाण्याची बचत खालीलप्रमाणे सहज करु शकता...

» पिण्याचे पाणी वाहने स्वच्छ करण्याकरिता वापरु नका. अंगण, जिने किंवा फरशी धुणे टाळा, स्वच्छतेकरिता कमीत कमी पाण्याचा वापर करा. घरातील गळणारे नळ तत्काळ दुरुस्त करुन घ्या. घरासमोरील रस्त्यावर पाणी मारु नका, रस्ते धुवू नका. कुंड्यातील झाडे, बागकामासाठी पिण्याचे पाण्याचा वापर करु नका. तरी सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, सर्वांनी आपली जबाबदारी ओळखून काटकसरीने पाणी वापरावे व पाण्याची बचत करावी, जेणेकरुन येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी पाणी टंचाई निर्माण होणार नाही, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## मीटर तपासणीसाठी प्रशासन 'मेहरबान'

### » 'कॅनबेरी' लाच काम : महापालिका एजन्सी पोसतेय काय?

। पिंपरी ।महाईन्यूज ।




पिंपरी-चिंचवड शहरातील निवासी व बिगर निवासी नळ जोडला लावलेल्या मीटरची तपासणी करून बिल अदा करण्यासाठी 'कॅनबेरी एनएक्स सर्व्हिसेस' ही एजन्सी काम करीत आहे. त्यांच्या कामाची ५ वर्षे संपली तरी, त्यांना सन २०२१ पासून आतापर्यंत तब्बल सातवेळा मुदतवाढ बहाल करण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाला निविदा काढण्यास वेळ मिळत नसल्याने एकाच एजन्सीला पोसण्याचे काम सुरू असल्याचे स्पष्ट होत आहे. घरोघरी जाऊन पाणी मीटरची तपासणी करून बिले देण्याचे काम भाजपच्या सत्ताकाळात कॅनबेरी एजन्सीला २५ फेब्रुवारी २०१६ ला देण्यात आले. ही मुदत २३ फेब्रुवारी २०२१ पर्यंत ५ वर्षांसाठी होती. त्यासाठी तब्बल १६ कोटी ७ लाख २५ हजार २५४ खर्च झाला. ती पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर निविदा काढली गेली नाही. त्यानंतर तीन ते सहा महिन्यांची तब्बल सात वेळा मुदतवाढ त्या एजन्सीलाच देण्यात आली आहे. नवीन मुदतवाढ ३० सप्टेंबर २०२४ पर्यंतची आहे.

### पाणीपट्टी भरणे होणार सुलभ : प्रदीप जांभळे-पाटील

» येत्या २०२४-२५ या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२४ पासून मालमत्ताकरात पाणीपट्टी समाविष्ट केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना मालमत्ताकर बिलासोबतच पाणीपट्टी भरणे सुलभ होणार आहे, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी जाहीर केले आहे. मालमत्ताकराची बिले महिला बचत गटांकडून घरोघरी जाऊन वाटली जातात. त्यामुळे स्वतंत्रपणे पाणीपट्टी बिले वाटपाच्या खर्चात बचत होणार आहे.

# वाढता विरोध; खा.बारणेंची डोकेदुखी!

## आमदार शेळके आणि खासदार बारणे यांच्यात मतभेद वाढले

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मागील दोन लोकसभा निवडणुकांमध्ये खंबीरपणे साथ देणाऱ्या घाटावरील म्हणजेच पुणे जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघातील भाजपचा आणि महायुतीतील नवीन मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचा खासदार श्रीरंग बारणे यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध असल्याचे दिसून येत आहे. कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेत महायुतीनेही सावध पावले टाकत अद्याप मतदारसंघ कोणाला सुटणार हे जाहीर केले नाही.**




महायुतीकडून खासदार बारणे यांना जर उमेदवारी मिळाली. तर, त्यांच्यासाठी घाटावरील वाढता विरोध डोकेदुखी ठरण्याची चिन्हे आहेत.मावळ लोकसभा मतदारसंघ रायगड आणि पुणे जिल्ह्यात विभागलेला आहे. या मतदारसंघावर पुणे जिल्ह्याचेच वर्चस्व राहिले आहे. सलग तीनवेळा पिंपरी-चिंचवडकडे प्रतिनिधित्व आहे. भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीत हा मतदारसंघ शिवसेनेकडे आहे. २०१४ आणि २०१९ च्या दोन्ही लोकसभा निवडणुकीत भाजपचे तत्कालीन नगरसेवक आणि आताचे मावळचे आमदार सुनील शेळके आणि माजी आमदार बाळा भेगडे यांनी बारणे यांचे मनापासून काम केले. त्यांना मावळातून मताधिक्य मिळवून दिले होते. परंतु, आता ते दोघेही विरोधात दिसत आहेत. आमदार शेळके उघडपणे तर भेगडे यांचे कार्यकर्ते जाहीरपणे खासदार बारणे यांना विरोध करताना दिसून येत आहेत. महायुतीत सहभागी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पिंपरीतील पदाधिकाऱ्यांनीही मावळची उमेदवारी राष्ट्रवादीला मिळावी, अशी मागणी केली आहे. तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदी अधिकारी आणण्यावरून आमदार शेळके आणि खासदार बारणे यांच्यात मतभेद वाढले. तेव्हापासून शेळके यांचा बारणे यांना विरोध वाढल्याचे दिसून येत आहे. तर, महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आल्याने आणि विद्यमान आमदार शेळके असल्याने विधानसभेला मतदारसंघ शेळके यांनाच सुटेल, हे गृहीत धरून भेगडे यांनी लोकसभा लढविण्याची इच्छा व्यक्त केल्याची चर्चा आहे. भेगडे यांचे कार्यकर्ते खासदार बारणे यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध करताना दिसतात. लोकसभेला संधी मिळाली नाही. तर एखादे राजकीय आश्वासन घेता येईल, या दृष्टीने भेगडे यांनीही जोर लावल्याचे दिसते. पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपच्या कार्यकर्त्यांनीही कमळावर उमेदवार असावा.

### मावळमधून वाढत आहे विरोध

» अशी भूमिका घेतली आहे. दुसरीकडे मागीलवेळी पार्थ पवार यांचा पराभव झाल्याने त्याचे उट्टे काढण्यासाठी राष्ट्रवादीने विरोधी सूर आवळल्याची चर्चा आहे. माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनी उमेदवारीसाठी आग्रह धरला आहे. एकंदरीतच खासदार बारणे यांना स्वत:चा हक्काचे मतदार असलेल्या घाटावरील पिंपरी-चिंचवड, मावळमधून विरोध वाढत आहे. घाटावरील वाढता विरोध त्यांची डोकेदुखी वाढविणारा आहे.घाटाखाली शांतता मावळ मतदारसंघात पुणे आणि रायगड जिल्ह्यातील तीन अशा सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश येतो. पुणे जिल्ह्यातील घाटावरील मावळ, पिंपरीत राष्ट्रवादीचे तर चिंचवडला भाजपच्या आमदार आहेत. तर, घाटाखालील भाजपचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर लोकसभेसाठी इच्छुक नसल्याचे सांगितले जाते. उरणचे अपक्ष आमदार महेश बालदी भाजपशी संलग्न आहेत. कर्जतमध्ये शिवसेनेचे महेंद्र थोरवे आमदार असून लोकसभेसाठी इच्छुक नाहीत. मागील दोन लोकसभा निवडणुकांमध्ये खंबीरपणे साथ देणाऱ्या घाटावरील म्हणजेच पुणे जिल्ह्यातील तीन मतदारसंघातील भाजपचा आणि महायुतीतील नवीन मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचा बारणे यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध असल्याचे दिसून येत आहे.

---

# ढगाळ हवामानामुळे द्राक्षांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव

## बेदाणा उत्पादनात 20 हजार टनांनी घट होण्याची शक्यता

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**बेदाणा उत्पादनाचा हंगाम ऐन जोमात असतानाच दर्जेदार द्राक्षांअभावी बेदाणा उत्पादन घटले आहे. दर वर्षी एप्रिलच्या अखेरपर्यंत होणारे बेदाणा उत्पादन, यंदा जेमतेम मार्चअखेरपर्यंतच सुरू राहून, एकूण बेदाणा उत्पादनात २० हजार टनांनी घट होण्याची शक्यता आहे.**



दुसरीकडे बेदाण्याच्या दरातील पडझडीमुळे शेतकऱ्यांची निराशा झाली आहे.सततचा अवकाळी पाऊस आणि ढगाळ हवामानामुळे द्राक्षांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला होता. द्राक्ष मण्यांना तडे गेल्यामुळे आणि फळमाशीमुळे घडकूज झाली होती. द्राक्ष घडावर करपा रोगाचे काळे डाग पडले होते. अवकाळीचा फटका बसल्यामुळे द्राक्षांची टिकवणक्षमताही कमी झाली होती. परिणामी यंदाच्या हंगामात द्राक्षाचा दर्जाही काहीसा घसरला होता. त्यामुळे जानेवारीपासून म्हणजे हंगामाच्या सुरुवातीपासूनच बेदाणा निर्मितीसाठी द्राक्षाची टंचाई भासू लागली होती. दर वर्षी मार्च महिन्यात हंगाम ऐन बहरात असतो. पण, यंदा मार्च महिन्यातच बेदाणानिर्मिती थंडावली आहे. दर वर्षी एप्रिलअखेरपर्यंत हंगाम चालतो. यंदा मार्चच्या अखेरीपर्यंत चालेल, अशी शक्यता माहिती कवठेमहांकाळ येथील द्राक्षउत्पादक दिनकर गुजले यांनी दिली.मागील काही वर्षांपासून प्रामुख्याने महाराष्ट्रात आणि कर्नाटकच्या सीमा भागात सरासरी दोन लाख टन बेदाण्याची निर्मिती होती. मागील वर्षाच्या हंगामात उच्चांकी दोन लाख ७० हजार टन बेदाण्याचे उत्पादन झाले होते. जानेवारी ते एप्रिल, असा चार महिने चालणारा हंगाम यंदा फक्त तीन महिनेच चालेल आणि बेदाणा उत्पादनात सरासरी वीस टक्क्यांनी घट होऊन एकूण बेदाणा उत्पादनात सरासरी २० हजार टनांनी घट होण्याचा अंदाज, तासगाव येथील बेदाणा उत्पादक प्रशांत जाधव यांनी व्यक्त केला आहे.तासगाव परिसरात उत्पादित झालेल्या दर्जेदार बेदाण्याला हंगामाच्या सुरुवातीस सरासरी २०० ते २७० रुपयांपर्यंत दर मिळतो. यंदाच्या हंगामात सुरुवातीपासूनच दर्जानिहाय १३० ते २३० रुपये प्रति किलो दर शेतकऱ्यांना मिळत आहे. एकीकडे द्राक्ष उत्पादन आणि बेदाणानिर्मितीचा दर वाढला आहे.

### घसरणीमुळे शेतकरी अडचणीत

» त्या तुलनेत बेदाण्याला चांगला दर मिळताना दिसत नाही. अपेक्षित दर न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी बेदाणानिर्मिती टाळून मिळेल त्या दराने किरकोळ बाजारात द्राक्ष विक्री केली आहे. दरात पडझड झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी बेदाणा विक्री थांबवून, आपला बेदाणा शीतगृहात साठवणूक करण्यास प्राधान्य दिले आहे. मागील हंगामाच्या प्रारंभी दर्जेदार बेदाण्याला प्रतिकिलो २०० ते २५० रुपये दर मिळला होता. यंदा हंगामाच्या मध्यावरही जेमतेम १३० ते २३० रुपये दर मिळत आहे.

# मावळ लोकसभा मतदार संघात

# संजोग वाघेरे यांचा 'जगताप पॅटर्न'!

## इमोशनल डिप्लोमसी : जगताप कुटुंबियांचा मिळवला 'सॉफ्ट कार्नर'

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदार संघाचा 'गड' काबिज करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांनी 'इमोशनल डिप्लोमसी' यशस्वी केली आहे. त्यांनी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतीस्थळाला भेट देत अभिवादन केले. त्याद्वारे वाघेरे यांनी पिंपरी-चिंचवडमधील मातब्बर आणि भाजपामधील 'किंग मेकर' घराणे जगताप कुटुंबियांचा 'सॉफ्ट कॉर्नर' मिळवला आहे. यामुळे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना महायुतीत प्रचंड आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करावा लागणार, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.**



### खासदार बारणे यांची तारेवरची कसरत...

» चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या स्थापनेनंतर २००९ मध्ये दिवंगत लक्ष्मण जगताप विरुद्ध श्रीरंग बारणे असा सामना झाला होता. त्यावेळी जगताप यांना अपक्ष ७८ हजार ७४१, तर बारणे यांना शिवसेनेकडून ७२ हजार १६६ अशी मते पडली होती. त्यावेळी काँग्रेसच्या तिकीटावर भाउसाहेब भोईर यांनी २४ हजार ६८४ मते घेतली होती. या निवडणुकीतील पराभवाचा वचपा काढीत २०१४ च्या मावळ लोकसभा निवडणुकीत श्रीरंग बारणे यांनी (५ लाख १२ हजार २२३ मते) शेतकरी कामगार पक्षाकडून निवडणुकीत उतरलेल्या लक्ष्मण जगताप यांचा (३ लाख ५४ हजार ८२९ मते) पराभव केला होता. हा पराभव जगताप यांच्या जिव्हारी लागला. तरीही २०१९ मध्ये महायुती धर्माचे पालन करीत जगताप बारणेंच्या पाठिशी राहिले होते. आताची परिस्थिती बदलली असून, भाजपातील काही नेत्यांचा बारणे यांच्या उमेदवारीला विरोध आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांनीही बारणेंना खुला विरोध केला आहे. आता संजोग वाघेरे यांनी थेट जगताप कुटुंबियांच्या भावनेला हात घातल्यामुळे बारणेंना पिंपरी आणि चिंचवड मतदार संघातून 'लीड' जमा करताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि खासदार श्रीरंग बारणे यांचा राजकीय संघर्ष सर्वश्रृत आहे. किंबहुना, जगताप यांना विरोध हाच बारणेंच्या राजकीय वाटचालीचा प्रमुख गाभा राहिला आहे. मात्र, २०१९ मध्ये महायुती धर्माचे पालन करीत लक्ष्मण जगताप यांनी बारणेंचा खुला प्रचार केला. त्यामुळे चिंचवड आणि पिंपरी विधानसभा मतदार संघातून बारणे यांना निर्णायक 'लीड' मिळाले होते. पार्थ पवार यांच्या पराभव पिंपरी-चिंचवडमध्येच करण्यात बारणेंना यश मिळाले. त्यात मोठे योगदान लक्ष्मण जगताप यांचे राहिले होते. आताच्या निवडणुकीत दिवंगत जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप भाजपाच्या आमदार आहेत आणि बंधू शंकर जगताप भाजपाचे शहराध्यक्ष आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीतसुद्धा चिंचवड आणि पिंपरीत 'जगताप पॅटर्न' चालणार हे निश्चित आहे. दरम्यान, सध्या लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाली. उमेदवारीची घोषणा आगामी दोन-तीन दिवसात होईल. खासदार बारणे यांनी अप्रत्यक्षपणे प्रचारालाही सुरूवात केली. पण, दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतीस्थळाकडे गेले नाहीत. याउलट, महाविकास आघाडीची उमेदवारी निश्चित असतानाही संजोग वाघेरे यांनी जगताप यांच्या स्मृतीस्थळाला भेट दिली आणि अभिवादन केले.

एव्हढेच नव्हे, तर "मी आणि दिवंगत जगताप म्हणजे "राम-लक्ष्मणाची जोडी" होतो..." अशी भावनिक सादही संजोग वाघेरे यांनी घातली. त्यामुळे चिंचवड आणि पिंपरीत जगतापांचा राजकीय विरोध मावळणार असून, संजोग वाघेरेंप्रति 'सॉफ्ट कॉर्नर' मिळणार आहे. स्वर्गीय आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांना अभिवादन केल्यानंतर संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, स्मृतीस्थळास भेट दिल्यानंतर जुन्या आठवणी जाग्या झाल्या आहेत. आमच्या दोघांची घटमैत्री होती. राम-लक्ष्मणाची जोडी म्हणून आम्हाला ओळखले जात होते. राजकीय भूमिका बदलत गेल्या. तरी देखील राजकारणापलिकडील मैत्री कायम होती.

कोणत्याही राजकीय, सामाजिक, धार्मिक व इतर कार्यक्रमांना आम्ही दोघे एकत्र उपस्थित राहत होतो. माझे वडील भिकू वाघेरे पाटील यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी आयोजित 6 जून रोजीच्या कार्यक्रमास ते पिंपरीगावात आवर्जून उपस्थित राहत. लक्ष्मणभाऊंनी चिंचवड मतदार संघाचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत आणि त्यांचे आशिर्वाद सोबत घेत मी मावळ लोकसभा मतदारसंघाचा विकास करून मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार आहे, असा विश्वास संजोग वाघेरे पाटील यांनी व्यक्त केला.

---

# 'फिर एक बार मोदी सरकार'साठी एकजूट करा!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप : 'वकिलांचा स्नेह मेळावा व विधिज्ञ नारीशक्ती पुरस्कार' वितरण

। पिंपरी। महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद मोदी यांचा पंतप्रधान पदाचा तिसरा कार्यकाळ देशातील महिला शक्तीच्या प्रगतीचा नवीन अध्याय लिहणार, असा विश्वास भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त करून 'फिर एक बार मोदी सरकार' साठी आपण सर्वांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहन केले. भाजपा कायदा आघाडी पिंपरी चिंचवड जिल्हा यांच्या वतीने जागतिक महीला दिनाचे औचित्य साधून 'वकिलांचा स्नेह मेळावा व विधिज्ञ नारीशक्ती पुरस्कार २०२४' सायन्स पार्क, चिंचवड येथे (दि. १२) रोजी पार पडला.**



### मोफत विधी सेवा केंद्र चालु करा : ॲड. धर्मेंद्र खांडरे

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांसाठी उज्वला गॅस योजना, शौचालय योजना, हर घर नल योजना इ. योजना राबविल्या असल्यामुळेत्याचा फायदा महिलांचा विकास होणेसाठी होत आहे. मोदीजींनी भारतीय राज्यघटनेतुन कलम ३७० काढून टाकले. प्रत्येक मुलाच्या नावामध्ये आईचे नाव समाविष्ट करून महिलांचा सन्मान वाढविला आहे. प्रत्येक प्रभागामध्ये विधी सेवा केंद्र चालु करून मोफत सल्ला देण्यासाठी प्रयत्न करावे, असे विचार कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. धर्मेंद खांडरे यांनी मांडले.

या कार्यक्रमात ॲड. संगीता परब, ॲड. शोभा कड, ॲड. दिपाली डुंबरे, ॲड. शोभा कदम, ॲड. तारा नायर या महिला वकीलांना 'विधीज्ञ नारीशक्ती' पुरस्काराने जिल्हा अध्यक्ष भाजपा शंकर जगताप, भाजपा कायदा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष ॲड. धर्मेंद खांडरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन ॲड. गोरखनाथ झोळ, अध्यक्ष कायदा आघाडी यांच्या नेतृवाखाली महिला आघाडी अध्यक्षा ॲड. पल्लवी विघ्रे, युवा अध्यक्ष ॲड. हर्षद नढे यांनी व नारीशक्ती पुरस्कार समिती वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. मंगेश लोहारे, सरचिटणीस ॲड. गोरख कुंभार, उपाध्यक्ष ॲड. अमोल माने, ॲड. अंकुश गोयल, चिटणीस ॲड. सोपान पाटील, ॲड. बालाजी पवार, ॲड. जया गोरे, ॲड. मनाली सावंत यांच्या कार्यकारिणीने पुरस्कर्त्यांची निवड केली. पिंपरी विधानसभा निवडणुक प्रमुख अमित गोरखे, दक्षिण भारतीय आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, जिल्हा सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मेडिगीरी, संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शैलजा मोळक, सुजाता पालांडे, आर एस कुमार, सुरेश भोईर, राजु दुर्गे, ॲड. श्रीकांत दळवी, ॲड. अतिश लांडगे, ॲड. रामराजे भोसले, ॲड. प्रमिला गाडे तसेच पिंपरी चिंचवड वकिल संघटनेचे पदाधिकारी व वकिल बंधु भगिनी, भाजपा कायदा आघाडीची सर्व कार्यकारिणी आणि कार्यक्रमास मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते. कायदा आघाडीचे अध्यक्ष ॲड. गोरखनाथ झोळ यांनी कायक्रमाची प्रस्तावना केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. दत्ता झुळुक, ॲड. अजितकुमार जाधव, ॲड. नितिन पवार, ॲड. जॉर्ज डिसोजा, ॲड. पुनम राऊत, महिला उपाध्यक्षा ॲड. अंतरा देशपांडे, ॲड. प्रियंका सुरवसे व महिला सरचिटणीस ॲड. प्रज्ञा कुलकर्णी, ॲड. संगिता कुशलकर व सर्व महिला पदाधिकारी यांनी प्रयत्न केले आहेत.

# 'सीएए'कडे भाजप वळला नसता




**गेल्या आठवडयामध्ये केंद्र सरकारसमोर जणू सांविधानिक तिढा निर्माण झाला होता. एकाच वेळी सरकारला अनेक गोष्टी सांभाळाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे देशव्यापी दौरे संपण्याची वाट पाहावी लागत होती, नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) लागू करण्याचा निर्णय अचानक घ्यावा लागला होता, त्यातच केंद्रीय निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी राजीनामा दिल्याने नवे आयुक्त नियुक्त करावे लागले होते.**




या सगळया घडामोडींमुळे लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर कधी होणार हा प्रश्न विचारला जात होता. अलीकडे विनाकारण लोक कुठल्या कुठल्या मुहूर्तांच्या मागे लागत असल्याने तसा काही प्रकार आहे का, या चर्चानाही ऊत आलेला होता. अखेर केंद्र सरकारने धावपळ करून नवे आयुक्त नेमले, केंद्रीय निवडणूक आयोगानेही लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होणार आहे, अशी आरोळी चोवीस तास आधी ठोकली. निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्याआधी आयोगाला किती गोष्टींचे व्यवधान सांभाळावे लागले असेल हे लक्षात येऊ शकते. आता पुढील अडीच महिने लोकसभा निवडणुकीचा धुरळा उडेल. लोकसभेची निवडणूक जसजशी जवळ येईल तसे भाजपला नवनव्या अजेंडयांचा वापर करावा लागत असल्याचे दिसते. रामाची लाट दोन महिन्यांच्या आत विरून गेलेली आहे. २२ जानेवारी रोजी अयोध्येमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिराचे उद्घाटन केले होते. या समारंभावेळी जमलेले देशातील तमाम मान्यवर बघितल्यानंतर रामराज्य अवतरले असेच जणू वाटू लागले होते. काहींनी तसे बोलूनही दाखवले होते. देशभरातील रामभक्तांना अयोध्येची वारी घडवून आणून रामलल्लाच्या दर्शनाची संधी दिली जाणार होती. राम मंदिराच्या उद्घाटनाचा सोहळा देशभर साजरा करण्याचे आदेशही भाजपने कार्यकर्त्यांना दिले होते. त्यातील किती कार्यकर्त्यांनी आपापल्या मतदारसंघातील रामभक्तांना म्हणजे भाजपच्या मतदारांना अयोध्येत नेऊन आणले हे माहीत नाही; पण त्याबद्दल कुठे चर्चा होताना दिसत नाही. उत्तर प्रदेश, गुजरात वगैरे भाजपचे अख्खे मंत्रिमंडळ अयोध्येत जाऊन आले. पण त्याकडे कोणाचे फारसे लक्ष गेलेले नाही. रामाची लाट आगामी लोकसभा निवडणुकीत फारसा लाभ मिळवून देणार नाही असे भाजपला वाटू लागले असावे. अन्यथा 'सीएए'कडे भाजप वळला नसता. भाजपने रामाच्या लाटेवर स्वार होऊन पाहिले, आता 'सीएए'चा मुद्दा हाती घेतला आहे. हिंदूत्व चालले नाही तर राष्ट्रवाद तरी चालेल अशी आशा भाजपने बाळगली तर चुकीचे नाही. लोकसभा निवडणुकीत राजकीय लाभाची गणिते प्रत्येक पक्ष मांडत असतो, मग भाजपने 'सीएए'चा मुद्दा हाती घेतला तर आक्षेप घेण्याचे कारण नाही, असा युक्तिवाद केला जाऊ शकतो. 'सीएए'ची अंमलबजावणी केंद्राला साडेचार वर्षांपूर्वी करायची होती; पण देशभर आंदोलन झाल्यामुळे 'आत्ता लगेच नको' असे म्हणत केंद्राने माघार घेतली होती. पण, आता वेळ येऊन ठेपलेली आहे. 'आत्ता नाही तर कधी', असा प्रश्न स्वत:ला विचारून 'सीएए' कायदा लागू करण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. देशातील आंदोलने संपलेली आहेत, काश्मीरमधील सर्व विरोध मोडून तिथला विशेषाधिकार काढला गेला, त्यानंतर काश्मीरमध्ये आंदोलन करण्याची ताकद राहिली नाही. 'सीएए'चे आंदोलनही संपले, तितक्या तीव्रतेने पुन्हा आंदोलन होण्याची शक्यता नाही. शेतकरी आंदोलन करत असले तरी त्यांना सिंघू सीमेवरूनही केंद्र सरकारने हलू दिलेले नाही. शेतकरी आंदोलनातील विखारीपणा कमी झालेला दिसतो. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर 'सीएए' कायदा लागू करण्याची उचित वेळ केंद्र सरकारने साधलेली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा 'सीएए' लागू होणारच असे छातीठोकपणे सांगत आहेत. रामाची लाट ओसरल्यावर 'सीएए'चा मुद्दा भाजपला तारू शकेल का हे बघायचे! बाकी राज्या-राज्यांतून विजयी होणारे उमेदवार अन्य पक्षांतून उधारीवर घेऊनही काम साधले जाऊ शकतेच. भाजप करत असलेल्या आघाडयाही त्याचाच भाग आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली 'चारसो पार'ची मेघगर्जना वीज बनून अंगावर तर पडणार नाही, या विवंचनेत भाजप दिवसाची रात्र करत असताना त्यांचे विरोधक आपल्याच मित्र पक्षांचा अजून अंदाज घेत आहेत. महाराष्ट्रात महाविकास आघाडीला जागावाटपाचा तिढा अजूनही सोडवता येऊ नये, ही कमाल म्हटली पाहिजे.

## संपादकीय »

### 'रोखुनी' मज पाहू

***विरोधकांच्या भ्रष्टाचारावर आसूड ओढणारेही वास्तवात तितके वा काही प्रमाणात अधिकच भ्रष्ट असू शकतात हे निवडणूक रोख्यांतून दिसते..***

वजनात मारून, मापात कापून कबुतरांना खायला घालण्याचा पुण्यकर्मी 'सत्संग' करणारे या देशात नेहमीच होते. पण ते वैयक्तिक पातळीवर. परंतु आर्थिक तोटा होत असतानाही आपल्या एकूण आर्थिक उलाढालीच्या कित्येक पट देणग्या राजकीय पक्षांना देणारे उद्योगपती महाभाग हे देशाने आताच पाहिले. त्यावरून या देशाचे वर्णन 'देणग्यांच्या देशा' असेही करता येईल. या देणग्यांच्या विश्वरूप दर्शनाबद्दल खऱ्या पारदर्शी व्यवस्थेची आस आणि आच असलेले सुजाण भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे आभारच मानतील. निवडणुका जाहीर होत असताना राजकीय पक्षांची ही देणगी दौलत समोर आणावी लागली हे महत्त्वाचे. या रोखे तपशिलास रोखता येईल तितके रोखावे असा प्रयत्न त्यांचा ठेका घेतलेल्या स्टेट बँकेने करून पाहिला. पण त्याच वेळी केंद्रीय यंत्रणांच्या बरोबरीने राष्ट्रीयीकृत बँकांच्या सरकारीकरणाचा प्रयत्नही कसा सुरू आहे हे दिसून आले.

मुंबईने नुकतेच विक्रमी ४२ व्यांदा रणजी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले, ही बातमी होत नाही. तर या अजिंक्यपदासाठी आठ वर्षे वाट पाहावी लागली, ही खरी बातमी. जवळपास ९० वर्षांच्या रणजी क्रिकेट स्पर्धेच्या इतिहासामध्ये ४०हून अधिक अजिंक्यपदे मुंबईच्या नावावर आहेत.

# मुंबई क्रिकेटचा रण(जी) विजय!



म्हणजे दर दोनेक वर्षांनी एकदा मुंबईकडून विजय अपेक्षित आहे. या समीकरणाच्या पार्श्वभूमीवर आठ वर्षे प्रतीक्षा म्हणजे प्रदीर्घ दुष्काळच. तसे पाहता आजघडीला मुंबईमध्ये क्रिकेटचे धडे गिरवून मोठे झालेले दहाहून अधिक खेळाडू भारताच्या विविध आंतरराष्ट्रीय संघांतून झळकत आहेत. रोहित शर्मा हा तिन्ही आंतरराष्ट्रीय संघांचा कर्णधार आहे. यशस्वी जयस्वाल, सर्फराझ खानसारखे खेळाडू भारताच्या कसोटी संघामध्ये जम बसवण्याचा प्रयत्न करत आहेत. अजिंक्य रहाणेसारखा मुरब्बी क्रिकेटपटू आज भारतीय संघात नाही, पण त्याचे नेतृत्वगुण आजही मुंबईसाठी लाभदायी ठरत आहेत. श्रेयस अय्यर, शार्दूल ठाकूर, पृथ्वी शॉ सध्याच्या कसोटी संघात नाहीत. पण तरी हे पुनरागमनासाठी आवश्यक उमेद आणि गुणवत्ता बाळगून आहेत. चंद्रकांत पंडित, प्रवीण अमरे, अभिषेक नायर, सुलक्षण कुलकर्णी या मुंबईकरांची गणना देशातील निष्णात प्रशिक्षकांमध्ये केली जाते. मुंबई क्रिकेटची समर्थ परंपरा ही मंडळीदेखील सांभाळत आहेत. ही परंपरा आहे खेळावरील निस्सीम प्रेमाची, सचोटीची आणि मेहनतीची. मुंबई क्रिकेटमध्ये आज अनेक उपनगरीय क्रिकेटपटू झळकत आहेत. रोहित शर्मा, अजिंक्य रहाणे, शार्दूल ठाकूर ही उदाहरणे वानगीदाखल देता येतील. पण क्रिकेटचे धडे घोटवून घेणारी शिवाजी पार्क, क्रॉस मैदान, आझाद मैदानसारखी केंद्रे आजही दक्षिण मुंबईतच आहेत. या ठिकाणी जायचे म्हणजे 'शिवाजी मुंबई' करावीच लागते. लोकलच्या प्रवासातून अनेक दिव्ये पार करत मैदानात सरावासाठी आलेल्या खेळाडूच्या मानसिक कणखरपणावर विशेष मेहनत घ्यावी लागत नाही. लोकल, बसप्रमाणे खेळाच्या मैदानावरही इच्छुकांची भलीमोठी रांग. अशा वेळी कशीबशी संधी मिळाल्यानंतर ती हातची जाऊ द्यायची नाही याकडेच कल. हीच ती सुप्रसिद्ध 'खडूस' वृत्ती. याच वृत्तीतून उम्रीगर, वाडेकर, गावस्कर, वेंगसरकर, मांजरेकर, तेंडुलकर, रहाणे घडले. याच वृत्तीतून ४० हून अधिक रणजी अजिंक्यपदेही चालून आली. युवा खेळाडू हा या परिसंस्थेचा एक भाग. पण या गुणवत्तेला मार्गदर्शनाची जोड हवीच. मुंबई क्रिकेटमध्ये असे मार्गदर्शक प्रत्येक दशकात निर्माण झाले. अण्णा वैद्य, कमल भांडारकर, वासू परांजपे, रमाकांत आचरेकर अशा गुरूंची मुंबई क्रिकेटला मोठी परंपरा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाइतकेच शिस्तीच्या आग्रहामुळे डोक्यात हवा गेलेले क्रिकेटपटू मुंबईत फारसे कधी आढळले नाहीत. क्रिकेटचे तंत्र घोटवून घेण्याबरोबरच प्रामाणिक माणूस म्हणूनही या गुरुजनांनी खेळाडूंना घडवले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मला केवळ निरोप आला होता : राज ठाकरे

## » निवडणुकीच्या तोंडावर भाजप-मनसे युती होणार?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर सर्वच पक्षांनी आता पक्षबांधणीला सुरुवात केली आहे. महायुतीचा जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नसून इंडिया आघाडीतही जागावाटपावरून धुसफूस सुरू आहे. दरम्यान, महायुतीत आता राज ठाकरेंचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षही सामील होण्याची चर्चा आहे. दरम्यान, राज ठाकरेही दिल्लीत रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**



"२०१९ प्रमाणे एकत्र येऊन भाजपाविरोधात लढलो तर राज ठाकरेंबद्दलची आपुलकी वाढेल. ते धाडसी आणि लढणारे नेते आहेत", असं रोहित पवार म्हणाले. "ईडी आणि विविध संस्थांना घाबरून एखादा नेता त्यांची भूमिका बदलत असेल तर योग्य नाही. आज लोकांना लढणारे नेते पाहिजेत.

महाराष्ट्राच्या हितासाठी सामान्य लोकांच्या वतीने महाशक्तीच्या विरोधात जो लढेल तो लोकांच्या मनात बसणार आहे. आज लढायची परिस्थिती असताना भाजपाबरोबर न जाता आपण एकत्र येऊन लढलं पाहिजे. तसंच महाराष्ट्राच्या बाजूने लढणं महत्त्वाचं आहे, असं आवाहनही रोहित पवारांनी केलं. राज ठाकरेंनी भाजपात न जाता महाविकास आघाडीत यावं असं वाटतं तर त्यांना आधी ऑफर का दिली नाही? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता रोहित पवार म्हणाले, "ऑफर देणारा मी कोण आहे. माझं एकच मत आहे की त्यांनी पुढाकार घेऊन चर्चा करणं गरजेचं आहे. नेत्यांबरोबर चर्चा झाली असेल की नाही माहित नाही. झाली असेल तर ती चर्चा पुढे जायला हवी, असंही रोहित पवार म्हणाले.महायुतीकडून राज ठाकरे यांना सोबत घेण्यासाठी गेल्या काही काळापासून जोरदार प्रयत्न सुरु असल्याची माहिती आहे. आता राज ठाकरे दिल्लीत जाऊन भाजपच्या वरिष्ठांची भेट घेतील अशी माहिती आहे. सुत्रांच्या माहितीनुसार, राज ठाकरे यांची दिल्लीतील भाजप मुख्यालयात किंवा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी बैठक होणार असल्याचं सांगितलं जात आहे. या बैठकी नंतर मनसे आणि भाजप युतीबाबत कोणता निर्णय होतो, हे स्पष्ट होईल.दिल्लीत पोहोचल्यावर राज ठाकरे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. मला या असा निरोप होता, अशी प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिली आहे. दिल्लीत पाय ठेवताच राज ठाकरे यांनी दिल्लीवारीवर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. दिल्लीत पोहोचल्यावर राज ठाकरेंनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देत सांगितलं की, मला या असा निरोप होता. राज ठाकरे बैठकीनंतर काय निर्णय घेणार याकडे आता सर्वाचं लक्ष लागलं आहे.महायुतीच्या लोकसभा जागावाटपावर शिक्कामोर्तब होण्याची शकयता आहे. दिल्लीमध्ये आज याबाबत महत्त्वाची बैठक पार पडणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. मात्र या बैठकी दरम्यान मनसे प्रमुख राज ठाकरे हे दिल्लीला रवाना झाले आहेत. त्यामुळे आता राज ठाकरे हे महायुतीत सामील होतील का अशी चर्चा रंगली आहे.

लोकसभा निवडणूकीच्या तारखा जाहीर झाल्या. या तारखा जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आलेला आहे. महायुतीच्या घटक पक्षांनी अनेक जागांवर दावा केलेला आहे. अशातच आता राज ठाकरे हे देखील महायुतीला पाठींबा देणार असल्याच्या चर्चेमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलेलं आहे. मनसेला महायुती जागा देणार का असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

### तर ती चर्चा पुढे जायला हवी

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज माध्यमांशी बोलताना एक मोठे विधान केले. राज ठाकरे आणि आमचे विचार एकसारखेच असल्याचे ते म्हणाले. त्यांच्या या विधानानंतर राज ठाकरे हे महायुतीसोबत राहणार का अशी चर्चा दिवसभर रंगली. या चर्चानंतर सायंकाळी उशिरा राज ठाकरे दिल्लीला रवाना झाल्याची माहिती समोर आली. त्यामुळे आता मनसे महायुतीत असेल का अशी चर्चा रंगली आहे."२०१९ प्रमाणे एकत्र येऊन भाजपाविरोधात लढलो तर राज ठाकरेंबद्दलची आपुलकी वाढेल. ते धाडसी आणि लढणारे नेते आहेत", असं रोहित पवार म्हणाले. "ईडी आणि विविध संस्थांना घाबरून एखादा नेता त्यांची भूमिका बदलत असेल तर योग्य नाही. आज लोकांना लढणारे नेते पाहिजेत. महाराष्ट्राच्या हितासाठी सामान्य लोकांच्या वतीने महाशक्तीच्या विरोधात जो लढेल तो लोकांच्या मनात बसणार आहे. आज लढायची परिस्थिती असताना भाजपाबरोबर न जाता आपण एकत्र येऊन लढलं पाहिजे. असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता रोहित पवार म्हणाले, "ऑफर देणारा मी कोण आहे. माझं एकच मत आहे की त्यांनी पुढाकार घेऊन चर्चा करणं गरजेचं आहे. नेत्यांबरोबर चर्चा झाली असेल की नाही माहित नाही. झाली असेल तर ती चर्चा पुढे जायला हवी.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल!

## »या लोकांना जनतेनेच दोन वर्षांपूर्वी तडीपार केलं : मुख्यमंत्री

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इंडिया आघाडीच्या शिवाजी पार्क मैदानातील सभेवर कडाडून टीका केली आहे. ज्यांना जनतेने आणि शिवसैनिकांनी दीड पावणेदोन वर्षांपूर्वी तडीपार केलं तेच लोक आता अब की बार तडीपारचा नारा देत आहेत असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला.**

राहुल गांधी यांचा ठाणे, मुंब्रा या ठिकाणी फ्लॉप शो झाला असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. हिंदू धर्माचा अपमान करणाऱ्यांना जनताच त्यांची जागा दाखवेल असंही एकनाथ शिंदे काही वेळापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत म्हणाले."जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो हे शब्द रविवारपासून बंद झाले. हिंदू बांधवांनो-भगिनींनो म्हणायला जीभ कचरली का? त्यांनी हे म्हणणं टाळलं त्यावरुन त्यावरुन पुन्हा लक्षात आलं की बाळासाहेबांचे विचार, त्यांची भूमिका, त्यांची विचारसरणी हे सगळं त्यांनी (उद्धव ठाकरे) सोडलं. त्यामुळे आम्हाला त्यांना सोडावं लागलं आणि मोठा निर्णय घेत बाळासाहेबांचे विचार पुढे



नेण्याचा निर्णय घ्यावा लागला. यांना जनतेने दोन वर्षांपूर्वीच तडीपार केलं आहे हे आम्हाला काय तडीपार करणार?" असाही बोचरा प्रश्न एकनाथ शिंदेंनी विचारला आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "राहुल गांधींनी हिंदूंचा अपमान केला आहे. जनता त्यांना जागा दाखवले. ५० ते ६० वर्षांत काँग्रेसने जे केलं नाही ते मोदींनी मागच्या १० वर्षांत करुन दाखवलं. त्याचा प्रत्यय आपल्याला येतोच आहे. देशाचा विकास आपल्यासमोर आहे. तसंच राज्यात दोन वर्षांत महायुतीने केलेलं काम आपल्या सगळ्यांच्या समोर आहे." असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. उद्धव ठाकरेंना पाचच मिनिटं वेळ भाषणासाठी देण्यात आली होती. यावरुन त्यांची इंडिया आघाडीत किती पत आहे ते दिसलं. राहुल गांधी बोलत असताना तिथे बसलेल्या लोकांच्या चेहऱ्यांवर नैराश्य दिसत होतं. बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतिस्थळासमोर ही सभा झाली. तो काळा दिवस ठरला कारण ज्यांनी वीर सावरकरांचा, हिंदू धर्माचा, सनातन धर्माचा अपमान केला अशा लोकांसह उद्धव ठाकरे बसले होते. उद्धव ठाकरेंनी त्याबद्दलही माफी मागितली पाहिजे अशीही मागणी एकनाथ शिंदेंनी केली.

### दोन वर्षांत केलेलं काम समोर

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "राहुल गांधींनी हिंदूंचा अपमान केला आहे. जनता त्यांना जागा दाखवले. ५० ते ६० वर्षांत काँग्रेसने जे केलं नाही ते मोदींनी मागच्या १० वर्षांत करुन दाखवलं. त्याचा प्रत्यय आपल्याला येतोच आहे. देशाचा विकास आपल्यासमोर आहे. तसंच राज्यात दोन वर्षांत महायुतीने केलेलं काम आपल्या सगळ्यांच्या समोर आहे." असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

# सत्य बोललो की, अर्थ बदलतात!

## मी जी शक्ती बोललो त्या शक्तीचा मुखवटा मोदी : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबईमध्ये झालेल्या इंडिया आघाडीच्या रॅलीतून काँग्रेस नेते राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांनी शक्तीविरोधात लढत असल्याचे म्हटल्यानंतर त्याचा अर्थ भाजपने बदलून धर्माशी जोडण्याचा प्रयत्न केल्यानंतर राहुल गांधी यांनी कडक शब्दात समाचार घेतला. राहुल गांधी यांनी मी सत्य बोलल्यानंतर मोदी अर्थ बदलून टाकतात, अशा शब्दात त्यांनी मोदी यांना प्रत्युत्तर दिले. राहुल यांनी ट्विट करून म्हटले आहे की, मी ज्या शक्तीचा उल्लेख केला आहे, ज्या शक्तीशी आपण लढत आहोत, त्या शक्तीचा मुखवटा आहे मोदीजी. मोदीजींना माझे शब्द आवडत नाहीत, ते नेहमी कुठल्या ना कुठल्या मार्गाने त्यांचा अर्थ बदलण्याचा प्रयत्न करतात कारण त्यांना माहित आहे की मी खोल सत्य बोललो आहे. मी ज्या शक्तीचा उल्लेख केला आहे, ज्या शक्तीशी आपण लढत आहोत, त्या शक्तीचा मुखवटा आहेत मोदीजी.**




ते पुढे म्हणतात, अशी शक्ती आहे की ज्याने आज भारताचा आवाज, भारताच्या संस्था, सीबीआय, आयटी, ईडी, निवडणूक आयोग, मीडिया, भारतीय उद्योग आणि भारताची संपूर्ण घटनात्मक रचना आपल्या तावडीत घेतली आहे. त्याच सत्तेसाठी नरेंद्र मोदीजी भारतीय बँकांचे हजारो कोटींचे कर्ज माफ करतात, तर काही हजार रुपयांचे कर्ज फेडू न शकल्याने एक भारतीय शेतकरी आत्महत्या करतो. तीच शक्ती भारताच्या बंदरांना, भारतातील विमानतळांना दिली जाते, तर भारताच्या तरुणांना अग्निवीराची भेट दिली जाते, ज्यामुळे त्यांचे धैर्य भंग पावते. त्याच शक्तीला रात्रंदिवस सलाम करत असताना देशातील माध्यमे सत्य दडपून टाकतात. त्याच सत्तेचे गुलाम नरेंद्र मोदी जी देशातील गरिबांवर जीएसटी लादतात, महागाईवर नियंत्रण न ठेवता ती ताकद वाढवण्यासाठी देशाच्या संपत्तीचा लिलाव करतात.भारत जोडो न्याय यात्रेच्या सांगता समारोपात राहुल गांधी यांनी भाजपावर निशाणा साधला होता. भाजपा ही एक शक्ती असून त्याविरोधात आपण लढत असल्याचं त्यांनी जाहीर केलं होतं. तसंच, शक्ती हा शब्द हिंदू धर्मातील असल्याचंही ते बोलले होते. त्यांच्या या वक्तव्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही समाचार घेतला. मोदींच्या टीकेनंतर राहुल गांधींनीही त्यांच्या शक्ती शब्दावरून स्पष्टीकरण दिलं आहे.रविवारी शिवाजी पार्कात जनतेला संबोधित करताना राहुल यांनी EVM बाबत आघाडीची चिंता मांडली. ते म्हणाले, "हिंदू धर्मात 'शक्ती' हा शब्द आहे. आम्ही एका शक्तिविरोधात लढत आहोत. प्रश्न असा आहे की ती शक्ती काय आहे आणि तिचा आपल्यासाठी काय अर्थ आहे? ईव्हीएमपासून अंमलबजावणी संचालनालयापर्यंत देशातील सर्व संस्था मोदी सरकारच्या दबावाखाली आहे. राहुल यांनी हिंदू धर्मातील शक्तीच्या पूजनीय व्यक्तिमत्त्वाचा अपमान केल्याचा दावा करून मोदींनी सोमवारी त्यांच्यावर टीकास्त्र डागलं. "आम्ही भारतात शक्तीची पूजा करत नाही का? आम्ही आमचे चांद्रयान शिवशक्तीला (लँडिंगच्या जागेला दिलेले नाव) समर्पित केले आहे. भाजपासाठी शक्ती ही प्रत्येक स्त्रीचे प्रतीक आहे. माझ्यासमोर शक्ती-स्वरूपातील मुली, महिला, बहिणी आहेत. त्या मला आशीर्वाद देण्यासाठी आल्या आहेत. माझ्यासाठी प्रत्येक आई, बहीण, मुलगी शक्तीचे प्रतीक आहे. मी भारत मातेचा भक्त आहे. माता-भगिनींच्या सुरक्षेसाठी मी माझ्या प्राणांची आहुती देईन."पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या वक्तव्यानंतर राहुल गांधी यांनी एक्सवरून त्यांच्या शक्ती शब्दावरून स्पष्टीकरण दिलं आहे. ते पोस्टमध्ये म्हणाले, मोदींना माझे शब्द आवडत नाहीत, ते नेहमी कुठल्या ना कुठल्या प्रकारे त्यांचा अर्थ बदलण्याचा प्रयत्न करतात कारण त्यांना माहित आहे की मी सत्य बोललो आहे.

### नरेंद्र मोदीही ती ताकद ओळखतात

» ज्या शक्तीचा मी उल्लेख केला आहे, ज्या शक्तीशी आपण लढत आहोत, त्या शक्तीचा मुखवटा मोदी आहेत. ही अशी शक्ती आहे की ज्याने आज भारताचा आवाज, भारताच्या संस्था, सीबीआय, आयटी, ईडी, निवडणूक आयोग, मीडिया, भारतीय उद्योग आणि भारताची संपूर्ण घटनात्मक रचना आपल्या तावडीत घेतली आहे. त्याच सत्तेसाठी नरेंद्र मोदीजी भारतीय बँकांचे हजारो कोटींचे कर्ज माफ करतात, तर काही हजार रुपयांचे कर्ज फेडू न शकल्याने एक भारतीय शेतकरी आत्महत्या करतो", अशी टीका राहुल गांधींनी केली."तीच शक्ती भारताच्या बंदरांना, भारतातील विमानतळांना दिली जाते, तर भारताच्या तरुणांना अग्निवीराची भेट दिली जाते, ज्यामुळे त्यांचे धैर्य भंग पावते.त्याच सत्तेचे गुलाम नरेंद्र मोदी जी देशातील गरिबांवर जीएसटी लादतात, महागाईवर नियंत्रण न ठेवता ती ताकद वाढवण्यासाठी देशाच्या संपत्तीचा लिलाव करतात", असंही ते म्हणाले."मी ती शक्ती ओळखतो, नरेंद्र मोदीही ती ताकद ओळखतात. ती कोणत्याही प्रकारची धार्मिक शक्ती नाही, ती अनीति, भ्रष्टता आणि असत्याची शक्ती आहे. म्हणूनच जेव्हा जेव्हा मी त्यांच्या विरोधात आवाज उठवतो तेव्हा मोदी आणि त्यांचे खोटे बोलणारे यंत्र नाराज आणि संतप्त होतात", असा पलटवार त्यांनी केला.

---

# निवडणूक रोखे हा नवा प्रयोग, त्यावर देखरेख : आरएसएस

## प्रत्येकदा रत्यावर उतरून आंदोलन करणेच आवश्यक नाही : होसबाळे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या महिन्याभरापासून देशभरात निवडणूक रोख्यांचा विषय चर्चेत होता. सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर अखेर एसबीआयनं विकलेल्या निवडणूक रोख्यांचा सर्व तपशील निवडणूक आयोगाला देण्यात आला. त्यानंतर गुरुवारी निवडणूक आयोगाने हा सगळा तपशील त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला आहे. या तपशीलातून निवडणूक रोख्यांबद्दल महत्त्वाची माहिती समोर येत आहे.**

यावरून आता राष्ट्रीय स्वयं सेवकसंघाने त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. नागपूरच्या स्मृती मंदिर परिसरात सुरू असलेल्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेचा रविवारी समारोप झाला. यावेळी सहकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे बोलत होते.निवडणूक रोख्यांवरून देशातील राजकीय वातावरण तापले आहे.



याकडे होसबाळे यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, संघाने आतापर्यंत याबाबत कुठलाही विचार केलेला नाही. मात्र, निवडणूक रोखे हा प्रयोग नव्याने होत असल्याने त्यावर देखरेख राहायला हवी. तसेच देशात कुठलीही नवीन गोष्ट आली की त्याच्यावर चार प्रश्न उपस्थित होतात. मात्र, प्रयोग करायला काही हरकत नाही असेही होसबाळे म्हणाले.समान नागरी कायद्याचे संघाने कायमच स्वागत केले आहे. उत्तराखंड राज्यामध्ये तो लागू झालेला आहे. प्रयोग म्हणून त्याकडे पाहायला हवे. त्यानंतर देशभरात हा कायदा कसा लागू करता येईल यावर विचार करायला हवा, असेही होसबाळे म्हणाले.काशी आणि मथुरा येथील मंदिराचा विषय संघाच्या प्रस्तावात कधीही नव्हता. ही मागणी धर्मसंस्थांची आहे. यासाठी संघाचे काही स्वयंसेवकही काम करत असतील तर आम्हाला आक्षेप नाही. मात्र, प्रत्येकदा रत्यावर उतरून आंदोलन करणेच आवश्यक नाही, असंही होसबाळे म्हणाले. मागील दहा वर्षांत देशाचा जगामध्ये सन्मान वाढला आहे. जगातील २५ अर्थतज्ज्ञ आणि विचारवंतांनी भारत हा भविष्यातील सर्वात शक्तिशाली देश बनेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे सरकारच्या दहा वर्षांच्या कामगिरीबद्दल बोलण्यापेक्षा देशातील जनता काय विचार करते हे ४ जूनच्या निकालातून दिसून येईल, असे होसबाळे म्हणाले.

### होसबाळेंची फेरनिवड

» प्रतिनिधी सभेच्या शेवटच्या दिवशी सकाळी विद्यमान सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांची या पदावर तीन वर्षांसाठी फेरनिवड करण्यात आली आहे. संघाच्या प्रतिनिधी सभेमध्ये सरकार्यवाह यांची निवड ही निवडणूक पद्धतीने केली जाते. मात्र, यासाठी सामान्य निवडणुकीप्रमाणे प्रक्रिया राबवली जात नाही. प्रतिनिधी सभेतील प्रमुख व्यक्ती या पदासाठी नावाची सूचना करतो, त्यानंतर त्या नावाला समर्थन आणि अनुमोदन दिले जाते.देशभरात निवडणूक रोख्यांचा विषय चर्चेत होता. सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर अखेर एसबीआयनं विकलेल्या निवडणूक रोख्यांचा सर्व तपशील निवडणूक आयोगाला देण्यात आला.

# श्वेता बच्चनच्या वाढदिवसाचं जंगी सेलिब्रेशन

रविवारी (१७ मार्च रोजी) अमिताभ बच्चन व जया बच्चन यांच्या लाडक्या लेकीचा म्हणजे श्वेता बच्चनचा वाढदिवस होता. श्वेताच्या वाढदिवसानिमित्त अनेक सेलिब्रिटींनी सोशल मीडियावर पोस्ट केल्या होत्या. अभिषेक बच्चननेही एक खास व्हिडीओ शेअर करत बहिणीला शुभेच्छा दिल्या होत्या. श्वेताच्या वाढदिवसाची जंगी पार्टीही करण्यात आली. पण या सर्वांनाच श्वेताच्या पतीचा वाढदिवसाचा मात्र विसर पडल्याचं दिसून आलं. श्वेता बच्चनचे पती व अमिताभ बच्चन यांचे जावई निखिल नंदा यांचा आज (१८ मार्च रोजी) ५० वा वाढदिवस होता.

पण त्यांच्या वाढदिवसानिमित्त श्वेता किंवा बच्चन कुटुंबातील कुणीही सोशल मीडियावर पोस्ट केल्याचं दिसून आलं नाही. ऐरवी छोट्या छोट्या क्षणांचेही फोटो स्टोरीला पोस्ट करणाऱ्या श्वेतानेही पतीच्या वाढदिवसाची मात्र पोस्ट टाकली नाही.अमिताभ बच्चन व अभिषेकही कुटुंबातील प्रत्येकाच्या वाढदिवसानिमित्त पोस्ट करत असतात, पण निखिल यांच्या वाढदिवसानिमित्त नव्या नवेली वगळता कोणीच सोशल मीडियावर पोस्ट केली नाही. फक्त नव्याने बाबांबरोबरचा तिचा बालपणीचा फोटो स्टोरीवर शेअर करत त्यांना शुभेच्छा दिल्या.



'वाढदिवसाच्या शुभेच्छा डॅड, आय लव्ह यू.' असं कॅप्शन नव्याने फोटोला दिलं होतं.दरम्यान, निखिल नंदा हे बच्चन कुटुंबातील कार्यक्रमांमध्येही फारसे दिसत नाहीत. अगस्त्य नंदाचा चित्रपट 'द आर्चीज' च्या स्क्रीनिंगला निखिल नंदा बच्चन कुटुंबाबरोबर दिसले होते. ऐरवी मात्र कधीच ते बच्चन कुटुंबाबरोबर दिसत नाही. निखिल नंदा हे उद्योगपती असून कामानिमित्त दिल्लीत राहतात, तर श्वेता मुलगा अगस्त्यबरोबर मुंबईत राहते. नव्या वडिलांच्या व्यवसायात मदत करते, तसेच स्वतःचा व्यवसायही सांभाळते, त्यामुळे ती दिल्ली व मुंबई असा प्रवास करत असते.रविवारी (१७ मार्च रोजी) अमिताभ बच्चन व जया बच्चन यांच्या लाडक्या लेकीचा म्हणजे श्वेता बच्चनचा वाढदिवस होता. श्वेताच्या वाढदिवसानिमित्त अनेक सेलिब्रिटींनी सोशल मीडियावर पोस्ट केल्या होत्या.

## रणदीप हुड्डा काय म्हणाला

रणदीप हुड्डा त्याच्या अनोख्या भूमिकांमुळे नेहमी चर्चेत असतो. २०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'सरबजीत'मधली त्याची भूमिका प्रचंड गाजली होती. सरबजीत सिंगची भूमिका साकारण्यासाठी रणदीपने चक्क २८ दिवसांमध्ये २० किलोपेक्षा जास्त वजन कमी केलं होतं. खऱ्या सरबजीतसारखं दिसण्यासाठी रणदीपने अक्षरशः स्वत:ला उपाशी ठेवलं होतं. आता रणदीपने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर करून पुन्हा एकदा चाहत्यांना धक्का दिला आहे. "काळं पाणी" असे कॅप्शन या फोटोला रणदीपने दिले आहे. रणदीपचा हा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यावर नेटिझन्सने विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. एकाने कमेंट करत लिहिले, "काय माणूस आहे हा. प्रत्येक भूमिका साकारण्यासाठी प्रचंड मेहनत घेतो." तर दुसऱ्याने लिहिले.

## कतरिनाची ही सवय

कतरिना कैफ आणि विकी कौशल बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल आहे. बॉलीवूडमधील अनेक इव्हेंट्स आणि पार्टीमध्ये दोघे एकत्र दिसतात. कतरिना जेव्हा घरी असते तेव्हा माझी आई आनंदी असते, असं एका मुलाखतीत विकी म्हणाला होता. अलीकडेच 'द वीक'ला दिलेल्या मुलाखतीत जेव्हा विकीला विचारण्यात आलं की, त्याला जेवण बनवता येतं का? तेव्हा विकी म्हणाला, "माझ्या संपूर्ण आयुष्यात जेवण करायला मला कधीच जमणार नाही. मी फक्त चहा बनवू शकतो आणि जास्तीत जास्त अंडं फोडू शकतो आणि हेसुद्धा मी कोरोना काळात शिकलो. कारण- तेव्हा मी रात्र रात्र जागून चित्रपट पाहायचो. कारण- त्या वेळेस माझ्याकडे दुसर करायला काहीच नव्हतं. सनी (विकीचा भाऊ) खूप चांगलं जेवण बनवतो. तो माझ्यापेक्षा फक्त एक वर्ष आणि चार महिन्यांनी लहान आहे. त्यामुळे आम्ही मित्रासारखेच राहतो. मी त्याला कोणताही सल्ला देत नाही आणि तो माझ्याकडून कोणताही सल्ला घेत नाही. आम्ही फक्त आमचे अनुभव एकमेकांना शेअर करतो. तो माझ्यापेक्षा खूप समजूतदार आणि शांत आहे."विकीला पुढे जेव्हा त्याच्या घरातील खाद्यपदार्थांच्या निवडीबद्दल विचारण्यात आलं तेव्हा तो म्हणाला, "खाण्याच्या बाबतीत सांगायचं झालं, तर कतरिना माझ्यापेक्षा जास्त शाकाहारी आहे. तिला साधं खायला खूप आवडतं. फार क्वचित ती छोले-भटुरे खाते; पण मी ते आवडीने खातो. जेव्हा कतरिना घरी असते तेव्हा माझ्या आईला खूप बरं वाटतं. ती म्हणते.



## सलमान खान पुन्हा चुलबुल पांडेच्या भूमिकेत

'टायगर ३'मधून कमबॅक करत सलमान खानने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. आता भाईजानच्या चाहत्यांसाठी एक मोठी खुशखबर समोर आली आहे. मीडिया रीपोर्ट्नुसार सलमान या ईदला कदाचित मोठ्या पडद्यावर झळकणार नाही. मात्र आगामी काळात तो साजिद नाडियाडवाला यांच्याबरोबर एक बहुप्रतीक्षित प्रोजेक्ट सुरू करणार अशी चर्चा आहे. खुद्द अरबाज खाननेही याची पुष्टी केली आहे की तो ब्लॉकबस्टर फ्रँचायझी 'दबंग' चा चौथा भाग तयार म्हणजेच 'दबंग ४' लवकरच प्रेक्षकांसमोर घेऊन येणार आहे. गेल्या काही दिवसांपासून अरबाज खानने 'जवान'चा दिग्दर्शक ॲटलीची भेट घेतली असून तो त्याच्याबरोबरच 'दबंग ४' सुरू करणार असल्याची चर्चा रंगली होती. आता नुकतंच 'मिड डे'शी संवाद साधताना अरबाजने या गोष्टीचा खुलासा केला आहे. अरबाजने अद्याप ॲटलीची भेट घेतली नसल्याचं त्याने स्पष्ट केलं आहे. अरबाज म्हणाला, "जोवर याबद्दल अधिकृत व्यक्तीकडून वक्तव्य येत नाही तोवर लोकांनी या अफवांवर विश्वास ठेवणं योग्य नाही."याबरोबरच या मुलाखतीमध्ये अरबाज खानने 'दबंग ४'चीदेखील पुष्टी केली. अरबाजच्या म्हणण्याप्रमाणे सलमान पुन्हा एकदा चुलबुल पांडेची भूमिका करण्यास फार उत्सुक आहे. शिवाय योग्य वेळ येताच याबद्दल घोषणा करणार असल्याचंही अरबाज खानने स्पष्ट केलं. सध्या सलमान आणि अरबाज दोघेही दुसऱ्या प्रोजेक्टमध्ये व्यस्त असल्याने अद्याप तरी याची अधिकृत घोषणा होणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे.पहिला 'दबंग' २०१० मध्ये प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट अनुराग कश्यपचा भाऊ अभिनव कश्यप याने दिग्दर्शित केला होता.



## तृप्ती डिमरी विकी कौशलसह देणार 'बॅड न्यूज

संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित 'ॲनिमल' चित्रपट सुपरहिट ठरला. रणबीर कपूर, रश्मिका मंदाना, बॉबी देओल, अनिल कपूर अभिनीत या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. या चित्रपटातील संवाद, गाणी हिट ठरली. मात्र या चित्रपटात लक्षवेधी ठरली ती भाभी २ म्हणजे अभिनेत्री तृप्ती डिमरी. तृप्तीने या चित्रपटातील अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. 'ॲनिमल'नंतर आता तृप्ती प्रेक्षकांना 'बॅड न्यूज' द्यायला देत आहे. प्रसिद्ध निर्माता, दिग्दर्शक करण जोहरने नुकतीच नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. सत्य घटनेवर आधारित असलेल्या या चित्रपटाचं नाव 'बॅड न्यूज' असं आहे. याच चित्रपटात तृप्ती डिमरीसह विकी कौशल आणि एमी विर्क झळकणार आहेत. या चित्रपटाचा पहिला लूक करणने सोशल मीडियावर शेअर केला आहे.२०१९मध्ये अक्षय कुमार, करीना कपूर, कियारा अडवाणी आणि दिलजीत दोसांझ यांची प्रमुख भूमिका असलेला 'गुड न्यूज' चित्रपट प्रदर्शित झाला होता. आता त्यानंतर 'बॅड न्यूज' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. करण जोहरने चित्रपटाचा पहिला लूक सोशल मीडियावर शेअर करत लिहिलं आहे, "एंटरटेनिंग हंगामासाठी तयार राहा. एक कॉमेडी चित्रपट येत आहे, जो सत्य घटनेवर आधारित आहे. 'बॅड न्यूज' १९ जुलै २०२४ला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे."दरम्यान, 'बॅड न्यूज' या चित्रपटाच्या पहिल्या लूकवर नेटकऱ्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. तृप्ती, विक्की, एमीच्या या नव्या चित्रपटासाठी उत्सुक असल्याचं नेटकऱ्यांनी करण जोहरच्या पोस्टवर लिहिलं आहे.संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित 'ॲनिमल' चित्रपट सुपरहिट ठरला. रणबीर कपूर, रश्मिका मंदाना, बॉबी देओल, अनिल कपूर अभिनीत या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. या चित्रपटातील संवाद, गाणी हिट ठरली.

# रोहितचा वारसा मी पुढे नेणार!

## हार्दिक पंड्याची मुंबई इंडियन्सच्या फॅन्सना ग्वाही

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ चा हंगाम सुरू होण्यासाठी आता अवघे काही दिवस उरले आहेत. पहिला सामना शुक्रवारी म्हणजेच २२ मार्च रोजी होणार आहे. चेन्नईत पहिल्या दिवशी आरसीबी आणि सीएसकेचे संघ आमनेसामने येतील. दरम्यान, ५ वेळा आयपीएल चॅम्पियन टीम मुंबई इंडियन्सची तयारीही जोरात सुरू आहे. यावेळी संघाची कमान हार्दिक पंड्याकडे असणार आहे. आता, आयपीएलच्या हंगामाच्या अवघ्या ४ दिवस आधी, हार्दिक पंड्याने एमआयचा माजी कर्णधार रोहित शर्माबद्दल मोठे विधान केले आहे.**



आगामी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यापूर्वी मुख्य प्रशिक्षक मार्क बाउचर यांच्यासमवेत पत्रकार परिषदेला संबोधित करताना, मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्या म्हणाला की त्याने मुंबई फ्रँचायझीचे नेतृत्व करण्याचा विचार कधीच केला नव्हता, ज्यांच्यासोबत त्याने आपल्या आयपीएल कारकीर्दीचा प्रवास सुरू केला होता.रोहित शर्माबद्दल बोलताना हार्दिक पंड्या म्हणाला, “यंदाच्या हंगामात काही वेगळे होणार नाही. जेव्हा जेव्हा मला मदतीची आवश्यकता असेल, तेव्हा तो तेथे असेल. तो भारतीय कर्णधार असल्याचे मी यापूर्वीही सांगितले आहे. मी जवळपास माझी संपूर्ण कारकीर्द त्याच्या कर्णधारपदाखाली घालवली आहे. कोणत्याही प्रकारची अस्वस्थता असेल असे मला वाटत नाही. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने जे काही साध्य केले ते मला पुढे घेऊन जायचे आहे. त्यामुळे मला माहित आहे की संपूर्ण हंगामात त्याचा हात माझ्या खांद्यावर असेल.”हार्दिक पंड्या पुढे म्हणाला, ‘खर सांगायचे तर आम्ही चाहत्यांचा आदर करतो, त्याचवेळी आम्ही खेळावर लक्ष केंद्रित करतो. मी चाहत्यांचा खूप आभारी आहे. चाहते जे काही बोलतात ते बोलण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे, मी त्यांच्या मताचा आदर करतो. तसेच, चांगली कामगिरी करण्यावर आमचा भर असेल.”किरॉन पोलार्ड आणि लसिथ मलिंगाबद्दल बोलताना हार्दिक पंड्या म्हणाला, मी किरॉन पोलार्ड आणि लसिथ मलिंगाबरोबर काम करण्यास उत्सुक आहे. पुन्हा एकदा दोघांसोबत काम करण्याची संधी मिळाल्याने मी आनंदी आहे. माझा आतापर्यंतचा प्रवास अप्रतिम राहिला. तसेच मी येथून पुढे सुरु होणाऱ्या प्रवासासाठी खूप उत्सुक आहे. आगामी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यापूर्वी मुख्य प्रशिक्षक मार्क बाउचर यांच्यासमवेत पत्रकार परिषदेला संबोधित करताना, मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्या म्हणाला की त्याने मुंबई फ्रँचायझीचे नेतृत्व करण्याचा विचार कधीच केला नव्हता, ज्यांच्यासोबत त्याने आपल्या आयपीएल कारकीर्दीचा प्रवास सुरू केला होता.रोहित शर्माबद्दल बोलताना हार्दिक पंड्या म्हणाला, “यंदाच्या हंगामात काही वेगळे होणार नाही. जेव्हा जेव्हा मला मदतीची आवश्यकता असेल, तेव्हा तो तेथे असेल. तो भारतीय कर्णधार असल्याचे मी यापूर्वीही सांगितले आहे. मी जवळपास माझी संपूर्ण कारकीर्द त्याच्या कर्णधारपदाखाली घालवली आहे. कोणत्याही प्रकारची अस्वस्थता असेल असे मला वाटत नाही. त्यामुळे मला माहित आहे की संपूर्ण हंगामात त्याचा हात माझ्या खांद्यावर असेल.”हार्दिक पंड्या पुढे म्हणाला.

### हंगामात काही वेगळे होणार नाही

आगामी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यापूर्वी मुख्य प्रशिक्षक मार्क बाउचर यांच्यासमवेत पत्रकार परिषदेला संबोधित करताना, मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्या म्हणाला की त्याने मुंबई फ्रँचायझीचे नेतृत्व करण्याचा विचार कधीच केला नव्हता, ज्यांच्यासोबत त्याने आपल्या आयपीएल कारकीर्दीचा प्रवास सुरू केला होता. रोहित शर्माबद्दल बोलताना हार्दिक पंड्या म्हणाला, “यंदाच्या हंगामात काही वेगळे होणार नाही. जेव्हा जेव्हा मला मदतीची आवश्यकता असेल, तेव्हा तो तेथे असेल. तो भारतीय कर्णधार असल्याचे मी यापूर्वीही सांगितले आहे. मी जवळपास माझी संपूर्ण कारकीर्द त्याच्या कर्णधारपदाखाली घालवली आहे. कोणत्याही प्रकारची अस्वस्थता असेल असे मला वाटत नाही. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने जे काही साध्य केले ते मला पुढे घेऊन जायचे आहे. त्यामुळे मला माहित आहे की संपूर्ण हंगामात त्याचा हात माझ्या खांद्यावर असेल.

# आयपीएलपूर्वी चेन्नई सुपर किंग्जला तिसरा धक्का!

## वेगवान गोलंदाजाला दुखापत, स्ट्रेचरवरून गेला मैदानाबाहेर

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेश आणि श्रीलंका यांच्यातील तिसरा एकदिवसीय सामना चट्टोग्राम येथे खेळला जात आहे. या सामन्यात दोन संघांना एकत्रितपणे मोठा धक्का बसला. बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमान गोलंदाजी करताना क्रॅम्पमुळे खेळपट्टीवर पडला. त्यानंतर त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर घेऊन जावे लागले. या गोलंदाजाच्या दुखापतीमुळे चेन्नई सुपर किंग्ज आणि श्रीलंका संघाला मोठा धक्का बसला आहे.**



या सामन्यात मुस्तफिजुर रहमान चांगली गोलंदाजी करत होता. त्याने ९ षटकांत २ बळी घेतले होते. पण ४२ व्या षटकात गोलंदाजी करताना क्रॅम्पमुळे खेळपट्टीवर पडला. ४२ व्या षटकाचा शेवटचा चेंडू टाकताना ही घटना घडली. मात्र, असे असतानाही तो ४८ वे षटक टाकण्यासाठी आला. जिथे त्याला अधिक समस्यांना सामोरे जावे लागले. तो ४८ व्या षटकाच्या रूपात शेवटचे षटक टाकण्यासाठी आला होता. जेव्हा त्याने पहिला चेंडू टाकला तेव्हा त्याला थोडे अस्वस्थ वाटले आणि क्रॅम्पमुळे खाली पडला. त्यानंतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे पथक मैदानावर आले. मुस्तफिझूरची प्रकृती खराब होती. त्यानंतर त्याला स्ट्रेचरवर मैदाना बाहेर नेण्यात आले. मात्र, मुस्तफिझूरचे उर्वरित षटक सौम्या सरकारने पूर्ण केले.आयपीएलपूर्वी चेन्नई सुपर किंग्जच्या अडचणी कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. सलामीवीर डेव्हॉन कॉन्वेनंतर युवा वेगवान गोलंदाज मथीशा पाथिरानाला दुखापत झाली होता. आता या यादीत मुस्तफिजुर रहमानचेही नाव समाविष्ट झाले आहे. चेन्नई सुपर किंग्जचा पहिला सामना २२ मार्च रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध होणार आहे. मुस्तफिझूर वेळेपूर्वी तंदुरुस्त होईल अशी आशा फार कमी आहे. त्यामुळे चेन्नईसाठी हा एक मोठा धक्का मानला जात आहे.

### मुस्तफिझूर वेळेपूर्वी तंदुरुस्त होईल

या सामन्यात मुस्तफिजुर रहमान चांगली गोलंदाजी करत होता. त्याने ९ षटकांत २ बळी घेतले होते. पण ४२ व्या षटकात गोलंदाजी करताना क्रॅम्पमुळे खेळपट्टीवर पडला. ४२ व्या षटकाचा शेवटचा चेंडू टाकताना ही घटना घडली. मात्र, असे असतानाही तो ४८ वे षटक टाकण्यासाठी आला. जिथे त्याला अधिक समस्यांना सामोरे जावे लागले. तो ४८ व्या षटकाच्या रूपात शेवटचे षटक टाकण्यासाठी आला होता. जेव्हा त्याने पहिला चेंडू टाकला तेव्हा त्याला थोडे अस्वस्थ वाटले आणि क्रॅम्पमुळे खाली पडला. त्यानंतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे पथक मैदानावर आले. मुस्तफिझूरची प्रकृती खराब होती. त्यानंतर त्याला स्ट्रेचरवर मैदाना बाहेर नेण्यात आले. मात्र, मुस्तफिझूरचे उर्वरित षटक सौम्या सरकारने पूर्ण केले.